**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ७३२/२०२५**
**जुना दावा क्रमांक १२४०/२०१६**
मंगल कुंभार वि. तुळशीदास कुंभार
निशाणी क्रमांक ८७ खाली

**प्रतिवादी क्र. १ ते ६ तर्फे साक्षीदार क्र. २ गुरुलिंग बलभीम कुंभार यांचा शपथेवर उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ एस. आर. काळे यांच्यामार्फत**

१. प्रतिवादी क्र. १ हा माझ्या बहिणीचा पती आहे. मी कुकडगावचा रहिवासी आहे. कुकडगाव येथे गट क्र. २६१ मध्ये मला शेतजमीन आहे. वाद जमीनी गट क्र. १५१ व १५२ कुकडगाव येथील आहेत. गट क्र. १५१ चे क्षेत्र ४ हे. १० आर आणि गट क्र. १५२ चे क्षेत्र २ हे. ३ आर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वाद जमीनी वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित आहेत. बळीराम यांना दोन मुले व चार मुली आहेत. सन २०१६ मध्ये बळीराम मयत झाले आहेत.

२. मयत बळीरामच्या मुलींनी वाद जमीनीतील त्यांचा असलेला हकक प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या हक्कात कोणत्या तारखेला सोडून दिला होता, ती तारीख मला सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की, सन २००९ मध्ये हकक सोडून दिला होता. हक्क सोडून दिल्याबाबत कोणताही दस्त लिहिण्यात आला नव्हता. बहिणींनी हक्क सोडून दिलेबाबत तसा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी संबंधित तलाठयाकडे दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकूर प्रतिवादीच्या सांगण्यावरुन लिहिण्यात आला आहे. हे म्हणणे खरे नाही की, बळीरामच्या मुलींनी माझ्या व साक्षीदार भास्कर दादाराव भोसले यांच्या समक्ष वाद जमीनीतील त्यांचा हिस्सा तोंडी स्वरुपात प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या हक्कात सोडून दिले होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना मदत व्हावी म्हणून मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.07.21 15:08:10 +0530

दिनांकः २१.०७.२०२६

**अ. अ. शेख**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा.

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | G. I. Khobre<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 21-07-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 21-07-2026 |
| Order uploaded on | - | 21-07-2026 |